सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७७ | शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाच्या गुरुवार, दि. १९ मार्च रोजी झालेल्या शुभारंभप्रसंगी बोलताना केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान. शेजारी व्यासपीठावर डावीकडून खासदार स्मितादाई वाघ, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, पद्मश्री सुभाष शर्मा, भागेय्याजी, प. पू. स्वामी विजयेंद्र सरस्वतीजी, मंत्री ना. गिरीश महाजन, पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, आमदार अनिलदादा पाटील, नवल रघुवंशी, डॉ. गजानन डांगे, सुनीलजी घनवट, मनोजभाई सोलंकी, डॉ. डिगंबर महाले. (छायाचित्रे : मयूर चौधरी, रॉकी पवार)

# भूमी सुपोषण अभियानात समाजातील सर्व घटकांनी सक्रीय सहभागी व्हावे

## केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान; अमळनेरातून राष्ट्रीय चळवळीचा झाला शुभारंभ





अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी आदी.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : सर्वांसाठी जीवनदायीनी असलेल्या भूमी मातेचा चैत्र शुद्ध वर्ष प्रतिपदेला अर्थात गुढीपाडव्याला जन्म दिवस असतो. या मंगलदिनी भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाचा श्री मंगळग्रह मंदिरातून शुभारंभ होत आहे याचा मनस्वी आनंद आहे. हे अभियान संपूर्ण देशात राबविण्यात येणार आहे. यात सर्व समाजघटकांनी सहभागी व्हावे. अन्नदात्या भूमीला आई मानून जैविक शेती करावी, असे आवाहन केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान यांनी केले.**

अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १९ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिरातून झालेल्या भूमी सुपोषण या राष्ट्रीय अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. प. पू. स्वामी नृसिंह विजयेंद्र सरस्वतीजी, पद्श्री डॉ. सुभाष शर्मा, महाराष्ट्र व छत्तीसगड मंदिर महासंघाचे संयोजक सुनीलजी घनवट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भागैय्याजी, अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोजभाई सोलंकी, उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे, युवा कल्याण व क्रीडा केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापनमंत्री ना. गिरीश महाजन, जळगावच्या खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व्यासपीठावर विराजमान होते. दरम्यान, ना. चौहान यांनी उपस्थित सर्व मंत्री व लोकप्रतिनिधींसह कृषी अवजारांच्या प्रदर्शनाला भेट दिली. रोटरी क्लब व लायन्स क्लब यांनी सर्व शेतकऱ्यांसाठी कैरी पन्ह्याची सोय केली होती.

ना. शिवराजसिंह चौहान पुढे म्हणाले, की चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून आपल्या हिंदू नववर्षाची सुरूवात होते. त्यामुळे आपल्या संस्कृतीची आपण जाणीव ठेवावी. ज्या मातीत आपण जन्मलो त्या मातीला माणूस विसरला आहे. पूर्वीच्या काळी शेतकरी नैसर्गिक शेती करीत होते. सेंद्रीय खतांचा वापर करत होते. त्यामुळे उत्पादनही चांगले व अन्नातही कस होता. मात्र, आता उत्पादन वाढविण्यासाठी विविध रासायनिक खतांचा वापर सुरू आहे. त्यामुळे भूमी मातेचे शोषण होत आहे. पाणी पातळी ही फुटांवर नव्हे, तर किलोमीटरने खालावली आहे. पेस्टिसाईड्स, इंजेक्शनचा अतिडोस देवून भाजीपाला, फळांचे उत्पादन केले जात आहे. त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. हृदयविकार, कर्करोगाचे प्रमाण त्यामुळेच वाढले आहे. रासायनिक खतांचा वापर करून एक पीक नव्हे तर बहुपिकाकडे शेतकऱ्यांचा कल आहे, हे धोकेदायक आहे. त्यामुळे दिवसेंदिवस जमिनीचा पोत खालावत आहे. त्यामुळे नैसर्गिक शेती करणे ही काळाची गरज आहे. शेतकरी हा अन्नदाता आहे. शेतकरी हाच खऱ्या अर्थाने राजाही आहे आणि जीवन देणारा कणा आहे. पाच एकर शेत असेल तर त्यात अर्धा एकर तरी नैसर्गिक शेती करावी.

पान २ वर




### श्री मंगळग्रह मंदिर देशातील पहिले 'एआय' मंदिर

अमळनेर येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिर आता देशातील पहिलेच 'एआय' मंदिर ठरले आहे. ना. शिवराजसिंहजी चौहान यांच्या हस्ते सदर एआय प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी यंत्रणा तंत्रज्ञ तुषार भारंबे, डॉ. युवराज परदेशी, चेतन गिरनार व मंगळग्रह सेवा संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान



"भूमी सुपोषण असे राष्ट्रीय अभियान आहे, की त्यामुळे देश प्रगतीशिल देश होईल. सर्वांनी यात सहभागही व्हावे. आपले कार्य समजून ते कार्य करावे. आजचा उत्सव हा सर्वात मोठा उत्सव आहे. भूमी मातेच्या मंगल नगरीतून याचा शुभारंभ होत आहे, ही अभिमानाची बाब आहे. समस्त भारतातील संतगण या कार्यासाठी सदैव पाठीशी आहेत. प्रत्येकानी आपली जबाबदारी समजून या अभियानास बळकटी द्यावी. शेतकरी भूमी सुपोषण करून सेंद्रीय शेती करावी. प्रत्येक शेतकऱ्याला भूमी मातेचा आशिर्वादही मिळेल. देशव्यापी चळवळीला हातभार लावून हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी योगदान देणे महत्वाचे आहे.

–प.पू. स्वामी नृसिंह विजयेंद्र सरस्वतीजी



"आज भूमी मातेचा जन्मोत्सव आहे आणि विशेष म्हणजे मंगल नगरीतूनच या भूमी सुपोषण अभियानाचा शुभारंभ होत आहे, हे अभिमानास्पद आहे. अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था महिनाभरापासून या कार्यक्रमासाठी परिश्रम घेत आहे. आपापल्या गावातून आणलेल्या मातीची श्री मंगळग्रह मंदिरात पूजा करावी. केंद्र सरकारने रासायनिक खते वापरू नये, यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे. भूमी सुपोषण अभियानांतर्गत शिबिरे आयोजीत करण्यात येतात. त्यात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. हे एक जन अभियान आहे. रासायनिक खते बनविणाऱ्या कंपन्या विदेशी आहेत. त्यात भारताचे हजारो करोड रुपये विदेशी घेऊन जात आहे. यासाठी आपण सेंद्रीय शेती करून स्वावलंबी बनावे.

**– श्री. भागैय्याजी, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**



"श्री मंगळग्रह मंदिरातून भूमी सुपोषण संवर्धन राष्ट्रय अभियानाचा शुभारंभ होत आहे, याचा मला अभिमान आहे. केवळ जळगाव, महाराष्ट्र नव्हे, तर देशभरात याचा प्रचार व प्रसार होईल. भारतातील हे पहिले मंदिर आहे जेथे ड्रेस कोड लागू झाला आहे. १७ हजार मंदिर सामाजिक कार्यासाठी योगदान देत आहेत. भूमी सुपोषणासाठी आपल्या मनात कृतज्ञता हवी. सद्यस्थितीत रासायनिक खतांच्या वापरामुळे भूमी नापीक होत आहे. आपण चांगले पिकवू शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने रासायनिक खतांचा वापर बंद करावा. भूमी पूजन करून भूमी सुपोषणाचा संकल्प करावा. यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे. प्रत्येकाने यात योगदान दिले तर याचा सर्वांनाच लाभ होणार आहे.

**– सुनीलजी घनवट**
**संयोजक, मंदिर महासंघ**



"भूमी मातेच्या जन्मदिनी मंगल भूमीतून भूमी सुपोषण संवर्धनाचा राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ होत आहे, याचा मनस्वी आनंद होत आहे. या अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे. सद्यस्थितीत वातावरण बदलामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे. मात्र, भूमी सुपोषणाच्या माध्यमातून यावर नियंत्रण आणता येणे शक्य आहे. मातीत जीव, जंतू असणे आवश्यक आहेत. मात्र, ते नाहीत. विविध रासायनिक खते, बी- बियाणांमुळे शेतीचा खर्चही वाढत आहे. त्यासाठी सेंद्रीय शेती करणे हाच एक पर्याय आहे. शेतीसाठी पोषक वातावरण असे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीत ३० टक्के वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. शेतासाठी ४० टक्के सिंचन असणे आवश्यक आहे. त्यासाठी भूमी सुपोषण संवर्धन होणे गरजेचे आहे.

**– पद्मश्री सुभाषजी वर्मा**



"चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थातच भूमी मातेचा आज जन्मोत्सव आहे. भारतीय शेती परंपरेला उर्जितावस्थेत आणण्याची गरज आहे. शेतकरी सध्या बाजाराच्या आधारावर शेती करीत आहे. मात्र, सेंद्रीय शेती ही आता काळाची गरज बनली आहे. यांत्रिक शेतीचा कमीत कमी वापर करून मानवरहित शेती करण्यावर भर द्यावा. भूमी कडून फक्त उत्पादनाची अपेक्षा करू नका. चांगल्या उत्पादनासाठी भूमीचे सुपोषण संवर्धनही करा. त्यासाठी प्रशिक्षणांमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा. आपला परिसर आपला विकास हे ध्येय ठेवावे. सेंद्रीय शेती कशी करता येईल यासाठी संकल्प करावा आणि आपापल्या गावात या अभियानाची जनजागृती करावी.

**– मनोजभाई सोलंकी**
**अध्यक्ष, अक्षय कृषी परिवार**



"भूमी सुपोषण अभियानामुळे देशातील हजारो गावांमध्ये भूमी पूजन व जनजागृती कार्यक्रमांद्वारे भूमी संवर्धनाला चालना मिळाली आहे. आता या जनजागरामुळे रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर कमी प्रमाणात होत असून, मोठ्या प्रमाणात शेतकरी रसायनमुक्त व सेंद्रीय शेतीकडे वळत आहेत. कृषी व पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांनी वारंवार सूचना केली आहे, की शेत जमीनीतील वाढत्या प्रदूषणामुळे उत्पादनावर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आजच भूमी सुपोषणाचा संकल्प करत यांत्रिकीकरणाने शेती करणे मर्यादित ठेवावे. शेतकरी व मजुरांमध्ये पारिवारिक भावना दृढ व्हावी.

**– डॉ. गजानन डांगे**
**उपाध्यक्ष, अक्षय कृषी परिवार**



"केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्यांनी लाडकी बहीण योजना राबवून कमाल करून दाखविली. आम्हीही त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून महाराष्ट्रात ही योजना राबवून धमाल करून दाखविली. आजचा कार्यक्रम हा खऱ्या अर्थाने आगळावेगळा कार्यक्रम आहे. शेतकऱ्यांनी शेतीचा विचार करणे गरजेचे आहे. तीचे सुपोषण संवर्धन होण्यासाठी प्रयत्न करावेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदींनी मातीचे परीक्षण करून शेती व्हावी, यासाठी आग्रही भूमीका घेतली आहे. रासायनिक खतांच्या वापरामुळे उत्पन्नावर परिणाम झाला आहे. भूमी सुपोषण संवर्धन अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे.

**– ना. गिरीश महाजन**
**जलसंपदा व आपत्ती व्यवस्थान मंत्री**



"केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे सर्वांचे मामा आहेत. विवाह सोहळ्यात वर पक्षाकडे व वधू पक्षाकडे दोन्हीकडे असतात. श्री मंगळग्रह मंदिराची ओळख भारतासह संपूर्ण जगात झाली आहे. भूमी सुपोषण संवर्धन अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ या मंगल नगरीतून होत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. हे अभियान संपूर्ण भारतात राबविले जात आहे. आपण आपल्या शेतीशी नाळ जुळवून ठेवावी. शेतीचे सुपोषण संवर्धन करून तीची काळजी घ्यावी. जळगाव जिल्हा हा केळी उत्पादक म्हणून भारताला परिचित आहे. त्यामुळे कोल्ड स्टोरेज आदी प्रकल्पांसाठी केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान यांनी विशेष पॅकेज जाहीर करावे.

**– ना. गुलाबराव पाटील**
**पालकमंत्री, जळगाव.**

## संपादकीय

# अटी–शर्तींचे धर्मस्वातंत्र्य

महाविकास आघाडीमधील शिवसेनेनेही (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पूर्वीच्या हिंदुत्ववादाला स्मरून या विधेयकाला पाठिंबा दिल्याने विरोधी आघाडीतील मतभेद चव्हाट्यावर आले. बळजबरीने होणारे धर्मांतर बेकायदा ठरवणारे ‘ महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०१६ ’ विधेयक राज्याच्या विधानसभेत संमत झाले. गेली अनेक वर्षे ‘धर्मांतर’ आणि ‘सक्ती–आमिषाचे धर्मांतर’ या विषयांवरून उलटसुलट चर्चा, वादंग आणि काही वेळा दंगलीही झाल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मांडलेल्या विधेयकामध्ये याबाबत काही मुद्द्यांच्या कायदेशीर व्याख्या करण्याचा प्रयत्न दिसून येतो; तर याच नियोजित कायद्यातील काही तरतुदी घटनेने दिलेल्या मूलभूत स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या असल्याचे आणि राजकीय अजेंडा चालवण्याचा हा प्रयत्न असल्याचे विरोधक आणि कायदेतज्ज्ञांचे आक्षेप आहेत. काही काळापूर्वी घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनांवरून वाद उभे राहिले होते. हिंदुत्ववादी संघटना आणि भारतीय जनता पक्षातील ‘धर्मरक्षक’ नेत्यांकडून गेला काही काळ असा कायदा करण्याची मागणी करण्यात येत होती; तसेच महायुतीच्या जाहीरनाम्यातही ‘कठोर धर्मांतरविरोधी कायदा’ आणण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार असे विधेयक विधानसभेत संमत झाले. नागरिकाने कोणता धर्म स्वीकारावा, याचे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे आणि धर्मप्रसाराचा अधिकारही दिला आहे. मात्र, बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर त्यामध्ये बसत नाही.

सन १९७७ मध्ये मध्य प्रदेशातील एका प्रकरणामध्ये ‘ बेकायदा धर्मांतर ’ नियंत्रित करण्याचा अधिकार राज्यांना असल्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्या आधारावर ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरियाणा व राजस्थान आदी १२ राज्यांमध्ये असे कायदे करण्यात आले आहेत. मात्र, यांपैकी काही कायद्यांतील काही तरतुदी संबंधित उच्च न्यायालयांनी रद्द केल्या आहेत; तसेच सर्वोच्च न्यायालयातही या कायद्यांविरोधातील याचिकांवर सुनावणी सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या नियोजित कायद्यात प्रामुख्याने ‘बेकायदा धर्मांतरा’ची व्याख्या करण्यात आली आहे. त्यानुसार पैसा, नोकरीचे आश्वासन, लग्नाचे वचन, भेटवस्तू किंवा मोफत शिक्षण–चांगले जीवनमान देण्याचे आश्वासन दाखविणे, एका धर्माचा गौरव वा धर्माच्या रूढींचे नुकसानकारक चित्रण आणि शिक्षणाद्वारे ‘ब्रेनवॉशिंग’ आदींच्या आधारे धर्मांतर बेकायदा ठरवले आहे. त्याबरोबरच धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीस ६० दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस द्यावी लागेल; त्यानंतर याबाबतची सूचना ग्रामपंचायत किंवा संबधित प्राधिकरणाच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल आणि आक्षेप आल्यास पोलिसांकडून चौकशी करण्यात येईल, अशी तरतूद आहे. याशिवाय असे आंतरधर्मीय विवाह बेकायदा ठरल्यास रद्द होतील आणि अपत्य झाल्यास त्याचा आईच्या पूर्वीच्या धर्मात समावेश होईल, बाळाचा ताबा आईकडे राहून त्याला वडिलांच्या संपत्तीवर हक्क सांगता येईल आणि पत्नीच्या पोटगीचा अधिकारही सुरक्षित राहील, अशा तरतुदी आहेत.

‘हे विधेयक कोणत्याही धर्मासाठी किंवा कोणाच्या विरोधात नाही,’ असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असले, तरी मुळात त्यांना असे खुलासे करावे लागतात, यावरून त्याबाबत सर्वांना विश्वासात घेण्यात आलेले नाही किंवा त्यातील तरतुदींबाबत सर्वसहमती नाही, असाच त्याचा अर्थ होतो. ‘हे विधेयक मुस्लिम समाजाच्या आकसापोटी आणि हिंदू मतपेढी डोळ्यासमोर ठेवून केले,’ असा मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा आक्षेप आहे. तर साठ दिवसांची पूर्वनोटीस म्हणजे धर्मस्वातंत्र्य व गोपनीयतेच्या अधिकारावर गदा असल्याचे कायद्याच्या अभ्यासकांचे मत आहे. विशेषत: ‘एका धर्माचा गौरव किंवा धर्माच्या रूढींचे नुकसानकारक चित्रण’ अशा तरतुदी ‘अतिव्यापक’ असल्याने भविष्यात कायदेशीर धर्मांतरही महाकठीण दिसते. अशा धर्मांतरांबाबत त्रयस्थ व्यक्तींना तक्रारीचे अधिकार किंवा धर्मांतर बेकायदा नसल्याचे सिद्ध करण्याची आरोपीवरील जबाबदारी अशा तरतुदी स्वातंत्र्याला मारक आहेत. पोलिसांनाही स्वत:हून कारवाईचे अधिकार ‘पोलिस राज’ला निमंत्रण ठरू शकते. अशा कायद्यामुळे आंतरधर्मीय विवाहांची प्रक्रिया अवघड होईल. राज्य सरकारने हे विधेयक संमत करून ‘राजकीय कार्यक्रम’ पूर्ण केला; आता अन्य बारा राज्यांप्रमाणेच सर्वोच्च न्यायालयातील घटनात्मक कसोटीच्या मंथनातून पार होण्याचे आव्हान आहे. तमाम आक्षेपांचे निराकरण करून सर्व धर्मीयांमध्ये विश्वास निर्माण करण्याची आणि स्वयंघोषित धर्मरक्षकांकडून समाजातील तेढ वाढून कायदा–सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी अर्थातच राज्य सरकारवर आहे.

# भूमी सुपोषण अभियानात समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे

पान १ वरून

त्यामुळे नक्कीच उत्पादन वाढेल. भूमी सुपोषण संवर्धनासाठी भारतासह जगभरातील वैज्ञानिक कामाला लागले आहेत. भारतात १८ लाख शेतकरी आता नैसर्गिक शेती करीत आहेत. त्याचे परिणामही चांगले आले आहेत. भूमी सुपोषित ठेवण्यासाठी आपल्याला जीव, जंतू, पशू–पक्षी सारे सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. हे भूमी सुपोषित करण्याचे अभियान नव्हे, तर आपलेही सुपोषण करण्याचे अभियान आहे. हे एक सामाजिक कार्य आहे आणि ते सर्वांनी मिळून करायचे आहे. भूमी मातेसाठी ममत्वाची भावना ठेवून तीला आई मानावे व नैसर्गिक शेतीचा संकल्प करावा. दरवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदेला भूमी मातेची पूजा करून जन्मोत्सव साजरा करावा. अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्थेने राबविलेले हे अभियान कौतुकास्पद आहे. जळगावसह महाराष्ट्रातील कृषी विकासासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. दरम्यान, सुरवातीला राजेंद्र वाघ यांनी स्वावलंबी स्वाभिमानी गीत सादर केले. अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक नवलजी रघुवंशी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह देवेंद्र तायडे यांनी सूत्रसंचालन केले. मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व डॉ. डिगंबर महाले यांनी व्यासपीठावरील सर्वांचा सत्कार व स्वागत केले. विशेष म्हणजे मंदिर भेटीत डॉ. महाले यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा ना. चौहान यांना सांगितल्या होत्या. कापूस उत्पादकांकडे विशेष लक्ष वेधण्यासाठी मंगळग्रह सेवा संस्थेने हार व बुके कापसापासून बनविले होते. कार्यक्रमाला शेतकरी बंधूंसह विविध पक्षांचे, समाजसेवी व कृषी विषयक संस्था आणि संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हाधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह अनेक विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### कार्यक्रम झाला भारतभर लाईव्ह

सदर कार्यक्रम देशातील सर्व कृषी विद्यापीठ, कृषी महाविद्यालये, कृषी संशोधन केंद्रे यांच्यासह देशातील ७५० जिल्ह्यांमध्ये लाईव्ह दाखविण्यात आला. तसेच ना. शिवराजसिंह चौहान यांच्या फेसबूक व यूट्यूब चॅनेलवरही लाईव्ह दाखविण्यात आला. देशातील व प्रादेशिक अग्रगण्य न्यूज चॅनेल्स व वृत्तपत्रांनी या कार्यक्रमाची ठळक दखल घेतली आहे.



### श्री मंगळग्रह मंदिरात आता आगळेवेगळे नैसर्गिक वातावरण

श्री मंगळग्रह मंदिर परिसरात प्रसादालयाच्या पाठीमागे मंगळग्रह सेवा संस्थेने नितांत सुंदर रोपवाटिका व विविध कार्यक्रमांसाठी निसर्गरम्य व्यवस्था केली आहे. सदर संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेचे लोकार्पण ना. शिवराजसिंहजी चौहान यांच्या हस्ते झाले. यावेळी अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## पाणीपुरवठा कंत्राटी कामगारांचा संप मागे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा तीन महिन्यांपासून पगार थकित होता. या पार्श्वभूमीवर गुरुवार, दि. १९ मार्च पासून संप पुकारणार होते. याबाबत त्यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन दिले होते. मात्र, पलिकेने यावर समाधानकारक तोडगा काढल्याने कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला आहे. येथील पाणीपुरवठ्याचा कंत्राट देण्यात आला अहो. १ डिसेंबर ते फेब्रुवारी २६ पासून कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली होती. कंत्राटदाराला पालिकेकडून बिल मिळत नाही. म्हणून कंत्राटदार कामगारांचा पगार करत नाही अशी परिस्थिती होती. ३०० रुपये रोज या तुटपुंज्या पगारावर जेमतेम काम करणाऱ्या कर्मचाऱ्याना दैनंदिन गरजा भागवणे आणि औषधोपचार करणे अवघड झाले होते. म्हणून सर्व कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकारीना निवेदन दिले होते. त्यात त्यांनी वेतन न झाल्यास १९ मार्चपासून पाणीपुरवठा काम बंद करण्याचा इशारा दिला होता.






अमळनेर : भूमी मातेच्या जन्मदिनानिमित्त विधिवत पूजन करताना केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान, प. पू. स्वामी विजयेंद्र सरस्वतीजी व उपस्थित मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात कृषी अवजारांच्या प्रदर्शनाची पाहणी करताना केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान.

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. सदानंद बडगुजर**
अमळनेर



**श्री. देव चौधरी**
सेवेकरी, अमळनेर

# चैत्र नवरात्रात उपवास करताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्याल ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

चैत्र नवरात्र कधी सुरू होणार आहे ? नवरात्रात काय खावे आणि काय खाऊ नये ? जर तुम्हीही या उन्हाळ्याच्या हंगामात नवरात्रीचा उपवास करण्याचा विचार करत असाल तर तुम्ही काय लक्षात ठेवले पाहिजे. चैत्र नवरात्र हा हिंदू धर्माचा एक पवित्र सण आहे. ज्यामध्ये माता दुर्गाच्या पूजेसह ९ दिवस उपवास केला जातो. २०२६ मध्ये चैत्र नवरात्र गुरुवार, दि. १९ मार्चपासून सुरू होईल आणि २७ मार्च २०२६ पर्यंत चालेल. हा काळ भक्ती आणि आत्मशुद्धीचा आहे. परंतु हा ऋतू उन्हाळ्याची सुरूवात असल्याने उपवासावेळी आरोग्याची काळजी घेणे खूप महत्त्वाचे ठरते. बऱ्याचदा लोक फक्त पूजेवर लक्ष केंद्रित करतात आणि अन्न किंवा शरीराच्या गरजांकडे दुर्लक्ष करतात. ज्यामुळे अशक्तपणा, डिहायड्रेशन आणि चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे उपवासाच्या नियमांबरोबरच योग्य आहार, पाणी, झोप आणि हलका व्यायाम यांचा समतोल राखणे गरजेचे आहे. बरेच लोक नवरात्रात उपवास करतात आणि या ९ दिवसांत शरीर हलके आणि उर्जेने परिपूर्ण ठेवणे आवश्यक आहे. म्हणून या नऊ दिवसांत आपल्याला काय खावे आणि काय टाळावे हे आपल्याला माहीत असले पाहिजे.

### नवरात्रीच्या उपवासात काय खावे ?

उपवासादरम्यान शरीराचे पोषण करणाऱ्या पदार्थांचा समावेश करा.

केळी, सफरचंद, पपई, डाळिंब ही फळे, त्यानंतर बदाम, काजू, मनुका, साबुदाणा, बकव्हीट, वॉटर चेस्टनट पीठ दही, दूध आणि चीज. जर तुम्ही नवरात्रीच्या नऊ दिवसांचा उपवास केला तर या गोष्टींचे सेवन करून तुम्ही स्वत:ला ऊर्जावान ठेवू शकता आणि पुढील अशक्तपणा टाळू शकता.

### काय खाऊ नये ?

– अधिक तळलेले पदार्थ खाणे (जसे की साबूदाणा वडा)
– खूप गोड
– जास्त मीठ (सेंधा मीठ मध्यम प्रमाणात घ्या)
– चहा आणि कॉफीचे अतिसेवन
– जर तुम्ही या दिवसांत उपवासाच्या वेळी मोठ्या प्रमाणात तळलेले रोस्ट खाल्ले तर या गोष्टी शरीरात उष्णता आणि डिहायड्रेशन वाढवू शकतात.
– हायड्रेशन सर्वांत महत्त्वाचे आहे.
– उन्हाळ्यात उपवास करण्याचा सर्वांत मोठा धोका म्हणजे पाण्याची कमतरता. दिवसभरात ८–१० ग्लास पाणी प्यावे. नारळपाणी, लिंबू सरबत, ताक घ्या. टरबूज, काकडी यासारखी पाण्याने समृद्ध फळे खा. शरीर थंड आणि हायड्रेटेड ठेवणे महत्त्वाचे आहे, अन्यथा चक्कर येऊ शकते.

### झोपेची पूर्ण काळजी घ्या

जर तुम्ही नवरात्रीच्या काळात उपवास करत असाल तर या काळात शरीराला विश्रांती देणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्याला आपल्या झोपेची पूर्ण काळजी घ्यावी लागेल.

### दररोज ७–८ तास झोप घ्या

रात्री उशिरापर्यंत जागे राहणे टाळा. दिवसा जास्त झोपणे टाळा. चांगली झोप शरीराला रिचार्ज करते आणि थकवा कमी करते. काय काळजी घेतली पाहिजे ? रिकाम्यापोटी जास्त वेळ थांबू नये. जर आपल्याला चक्कर येत असेल किंवा अशक्तपणा येत असेल तर त्वरित काहीतरी खा. मधुमेह किंवा रक्तदाब असलेल्या रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. चैत्र नवरात्रीचा उपवास हा केवळ विश्वास ठेवण्याचीच चांगली संधी नाही तर शरीर डिटॉक्स करण्याचीही चांगली संधी आहे. परंतु उन्हाळ्याच्या हंगामात उपवास व्यवस्थित न ठेवल्यास आरोग्य बिघडू शकते. त्यामुळे भक्तीबरोबरच शरीराच्या गरजा समजून घेणे गरजेचे आहे. योग्य आहार, भरपूर पाणी, चांगली झोप आणि



हलकी हालचाल यामुळे तुम्ही हे ९ दिवस निरोगी आणि उत्साही बनवू शकता.

## खुनाच्या प्रकरणातील आरोपीला उच्च न्यायालयाकडून दिलासा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : चोपडा तालुक्यातील देवगाव येथील एका खून प्रकरणात आरोपी चंद्रशेखर नामदेव सपकाळे याला अमळनेर न्यायालयात शिक्षा सुनावली होती. मात्र, औरंगाबाद उच्च न्यायालयाकडून त्यास दिलासा मिळाला आहे. श्रीमती भावना रवींद्र पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १४ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांचे पती रवींद्र हे दारूच्या नशेत घरी आले होते. त्यावेळी घरात वाद सुरू असताना आरोपी चंद्रशेखर सपकाळे याला गैरसमज झाला की रवींद्र त्यालाच शिवीगाळ करत आहे. या संतापातून आरोपीने रवींद्र यांना लाथाबुयांनी बेदम मारहाण केली तसेच शिंगाड्याने पोट व छातीवर गंभीर प्रहार केले. या हल्ल्यात रवींद्र यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अडावद पोलिसांनी चंद्रशेखउ सपकाळे यावर खुनाचा गुन्हा दाखल केला होता. पुढील सुनावणीत अमळनेर येथील सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत कलम ३०४ (२) अंतर्गत १० वर्षांची साधी कैद आणि ५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. दरम्यान, या शिक्षेविरुद्ध आरोपीने औरंगाबाद येथील उच्च न्यायालयात फौजदारी अपील दाखल केले होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# बहुआयामी आवाजाचे अधिराज्य : अलका याज्ञिक

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसंगीताच्या सुवर्णयुगाला आपल्या सुरेल आवाजाने समृद्ध करणाऱ्या सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांचा जन्मदिन म्हणजे संगीतप्रेमींसाठी एक खास पर्वणीच आहे. त्यांच्या मधुर, भावपूर्ण आणि बहुआयामी आवाजाने अनेक दशकं रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवले आहे. अलका याज्ञिक यांचा जन्म २० मार्च १९६६ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांची आई शुभा याज्ञिक या शास्त्रीय संगीताच्या गायिका होत्या. त्यामुळे संगीताचा वारसा त्यांना घरातूनच लाभला. लहान वयातच त्यांनी गायनाची आवड जोपासली आणि वयाच्या केवळ 6व्या वर्षी त्यांनी आकाशवाणीवर गाणे सादर केले.



### कारकिर्दीची सुरूवात आणि यश

अलका याज्ञिक यांनी बालपणीच मुंबईत येऊन चित्रपटसृष्टीत आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सुरुवातीच्या काळात त्यांना संघर्ष करावा लागला, पण त्यांच्या चिकाटीने आणि प्रतिभेने त्यांना यश मिळवून दिले. त्यांच्या कारकिर्दीतील मोठा टप्पा म्हणजे तेजाब या चित्रपटातील 'एक दो तीन' हे गाणे. या गाण्याने त्यांना घराघरात प्रसिद्धी मिळवून दिली आणि त्या रातोरात स्टार गायिका बनल्या.

### गाजलेली गाणी

अलका याज्ञिक यांनी हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली अशा अनेक भाषांमध्ये हजारो गाणी गायली आहेत. त्यांच्या काही अजरामर गाण्यांमध्ये 'एक दो तीन'- तेजाब, 'तुझे देखा तो ये जाना सनम'- दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे, 'कुछ कुछ होता है'- कुछ कुछ होता है, 'ताल से ताल मिला'- ताल, त्यांच्या आवाजातील गोडवा आणि भावना प्रत्येक गाण्याला वेगळा आत्मा देतात.

### पुरस्कार आणि सन्मान

अलका याज्ञिक यांना त्यांच्या उत्कृष्ट गायनासाठी अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी अनेक वेळा फिल्मफेअर पुरस्कार जिंकले आहेत आणि भारतीय संगीतसृष्टीत आपले एक अढळ स्थान निर्माण केले आहे.

### शैली आणि वैशिष्ट्ये

त्यांच्या गायनाची वैशिष्ट्ये म्हणजे सुरेल आणि स्पष्ट उच्चार, भावनांची अचूक अभिव्यक्ती, विविध प्रकारच्या गाण्यांमध्ये सहजतेने जुळवून घेण्याची क्षमता, रोमँटिक, भावगीत, नृत्यगीत किंवा भक्तिगीतप्रत्येक प्रकारात त्यांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे.

### आजच्या काळातील प्रभाव

आजही अलका याज्ञिक यांची गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. नव्या पिढीतील गायक-गायिकांसाठी त्या प्रेरणास्थान आहेत. त्यांचा आवाज म्हणजे भारतीय संगीताच्या सुवर्णक्षणांची आठवण करून देणारा एक अमूल्य ठेवा आहे. अलका याज्ञिक यांचा जन्मदिन म्हणजे त्यांच्या अमूल्य संगीत योगदानाचे स्मरण करण्याचा दिवस. त्यांच्या आवाजाने लाखो लोकांच्या भावना व्यक्त केल्या आहेत आणि संगीतप्रेमींच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण केले आहेत. **या सुरेल प्रवासाला आणि त्यांच्या कार्याला दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे मन:पूर्वक अभिवादन!**

# मराठी रंगभूमीचे अध्वर्यू : वसंत कानेटकर

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी रंगभूमीचे अध्वर्यू, नाटककार आणि साहित्यिक म्हणून ज्यांनी आपल्या लेखणीतून समाजमनाला भिडणारे विचार मांडले, त्या वसंत कानेटकर यांचा शुक्रवार, दि. २० मार्च रोजी जन्मदिन अर्थात मराठी साहित्यविश्वासाठी प्रेरणादायी स्मरणदिन आहे. त्यांच्या कार्याचा वेध घेताना आपण केवळ एका लेखकाची नव्हे, तर एका युगप्रवर्तक विचारवंताची ओळख करून घेता येईल.

वसंत कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२० रोजी झाला. ते प्रख्यात कवी आणि साहित्यिक कुटुंबात जन्मले होते. त्यांच्या वडिलांचे नाव कवी गिरीश (ग. दि. माडगूळकर नव्हे, तर कवी गिरीश म्हणजे दत्तात्रेय कानेटकर) होते, ज्यांचा त्यांच्या विचारविश्वावर खोल प्रभाव पडला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी प्राध्यापक म्हणून कार्य केले, पण त्यांची खरी ओळख निर्माण झाली ती नाटककार म्हणून.

### नाट्यसृष्टीतील योगदान

वसंत कानेटकर यांनी मराठी रंगभूमीला अनेक गाजलेली नाटके दिली. त्यांच्या लेखनात सामाजिक वास्तव, मानवी नातेसंबंध, मानसिक संघर्ष आणि मूल्यांची गुंतागुंत प्रभावीपणे दिसून येते. त्यांची काही गाजलेली नाटके : अश्रूंची झाली फुले, हिमालयाची सावली, इथे ओशाळला मृत्यू, सूर्यास्त, ग्रहण ही नाटके केवळ मनोरंजनासाठी नव्हती, तर ती समाजाला आरसा दाखवणारी होती.

### लेखनशैली आणि वैशिष्ट्ये

कानेटकर यांच्या लेखनाची काही ठळक वैशिष्ट्ये : प्रभावी संवादशैली, नाट्यमयता आणि उत्कंठा, मानवी मनाचा सखोल अभ्यास.

### सामाजिक प्रश्नांवर थेट भाष्य


त्यांच्या नाटकांमध्ये व्यक्तिरेखा अत्यंत जिवंत आणि वास्तववादी असतात, त्यामुळे प्रेक्षकांना त्यांच्याशी लगेच जोडले जाते.

### पुरस्कार आणि सन्मान

त्यांच्या साहित्यसेवेसाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. मराठी रंगभूमीवर त्यांचे योगदान अमूल्य मानले जाते. त्यांच्या नाटकांनी अनेक पिढ्यांना विचार करायला भाग पाडले.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही वसंत कानेटकर यांची नाटके तितकीच सुसंगत वाटतात. मानवी नात्यांमधील गुंतागुंत, नैतिक मूल्यांचा संघर्ष आणि सामाजिक वास्तव यांचे त्यांनी केलेले चित्रण आजही लागू पडते. वसंत कानेटकर यांचा जन्मदिन म्हणजे त्यांच्या साहित्यिक वारशाचे स्मरण करण्याची आणि त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेण्याची संधी आहे. मराठी रंगभूमीवर त्यांनी उभा केलेला ठसा अमिट आहे. त्यांच्या नाटकांनी केवळ रंगमंच गाजवला नाही, तर समाजमनालाही विचारप्रवृत्त केले. **त्यांच्या स्मृतींना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन!**



# मराठी चित्रपटांत तृतीय पुरुषी भूमिका गाजविणारे : गणपत पाटील



**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी चित्रपटसृष्टीतील खलनायकाच्या भूमिकेला एक वेगळी ओळख देणारे, अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात कायमचे घर करणारे अभिनेते गणपत पाटील यांचा शुक्रवार, दि. २० मार्च रोजी स्मृतिदिन अर्थात त्यांच्या प्रभावी कलाकृतींचे स्मरण करण्याचा दिवस आहे. त्यांच्या अभिनयाने मराठी सिनेमाला एक खास धार दिली आणि तृतीय पुरुषी भूमिकेलाही वेगळी उंची मिळवून दिली.

गणपत पाटील यांचा जन्म साध्या कुटुंबात झाला. सुरूवातीच्या काळात त्यांनी अनेक अडचणींना सामोरे जात अभिनय क्षेत्रात प्रवेश केला. त्यांच्या आयुष्यात संघर्ष मोठा होता, पण त्यांची जिद्द आणि मेहनत यामुळे त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले. गणपत पाटील यांना प्रामुख्याने खलनायकाच्या भूमिकांसाठी ओळखले जाते. त्यांनी साकारलेली 'सोंगाड्या' ही व्यक्तिरेखा विशेष गाजली. 'सोंगाड्या' या चित्रपटामुळे त्यांना मोठी लोकप्रियता मिळाली. त्यांच्या अभिनयात एक वेगळी तीव्रता आणि वास्तवता होती. त्यांनी साकारलेल्या खलनायकाच्या भूमिका इतक्या प्रभावी होत्या की प्रेक्षक त्यांच्या व्यक्तिरेखेला खऱ्या आयुष्यातही जोडून पाहू लागले.

### वैशिष्ट्यपूर्ण अभिनय

गणपत पाटील यांच्या अभिनयाची काही वैशिष्ट्ये- संवादफेकीतील दमदारपणा, व्यक्तिरेखेत पूर्णपणे समरस होण्याची क्षमता, खलनायकाच्या भूमिकेतही वास्तववादी सादरीकरण, त्यांच्या अभिनयामुळे मराठी चित्रपटांमध्ये खलनायक ही भूमिका केवळ नकारात्मक न राहता प्रभावी बनली.

### मराठी चित्रपटसृष्टीतील योगदान

गणपत पाटील यांनी अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. त्यांनी आपल्या अभिनयातून ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही प्रकारच्या कथा जिवंत केल्या.

### स्मृतिदिनाचे महत्त्व

त्यांचा स्मृतिदिन म्हणजे त्यांच्या कार्याची आठवण करून देणारा दिवस आहे. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत केलेले योगदान आजही नव्या कलाकारांसाठी प्रेरणादायी आहे. गणपत पाटील हे केवळ खलनायक नव्हते, तर ते एक प्रभावी कलाकार होते ज्यांनी आपल्या भूमिकांमधून समाजातील विविध पैलू उलगडून दाखविले. **त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन!**

# पर्यावरण समतोल राखण्यात चिमण्यांची भूमिका महत्त्वपूर्ण!

## जागतिक चिमणी दिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मानवाच्या दैनंदिन जीवनाशी घट्ट नाते असलेली, घरट्यांमधून चिवचिवाटाने आनंद पसरवणारी चिमणी आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या लहानशा पक्ष्याच्या संवर्धनासाठी दरवर्षी २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिन साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने चिमण्यांच्या अस्तित्वाविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे.

चिमणी हा एक साधा, सर्वसामान्य पक्षी असला तरी पर्यावरणातील तिचे योगदान मोठे आहे. शेतांमधील कीटक नियंत्रण, बियाण्यांचे प्रसारण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यात चिमण्यांची महत्त्वाची भूमिका असते. विशेषत: घरची चिमणी ही मानववस्तीच्या आसपास राहणारी आणि आपल्याशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणारी प्रजाती आहे.

### घटती संख्या एक गंभीर समस्या

गेल्या काही दशकांत चिमण्यांची संख्या झपाट्याने घटली आहे. यामागील प्रमुख कारणे- शहरीकरणामुळे निवासस्थानांचा अभाव, मोबाईल टॉवरमधून निर्माण होणारे किरणोत्सर्ग, रासायनिक कीटकनाशकांचा वाढता वापर, अन्न आणि पाण्याची कमतरता या सर्व कारणांमुळे चिमण्या हळूहळू आपल्या आसपासून नाहीशा होत आहेत.

### संवर्धनासाठी उपाय

चिमण्यांचे संरक्षण करण्यासाठी आपण काही सोपे उपाय करू शकतो. घराजवळ पाण्याची आणि धान्याची व्यवस्था करणे, घरटी बांधण्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देणे, रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करणे, झाडे लावणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण.

### जागतिक चिमणी दिनाचे उद्दिष्ट

नेचर फोरएव्हर सोसायटी या संस्थेच्या पुढाकाराने २०१० पासून हा दिवस साजरा केला जातो. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे चिमण्यांच्या संरक्षणासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्नांना चालना देणे. चिमणी ही केवळ एक पक्षी नाही, तर आपल्या संस्कृतीचा आणि पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तिचे अस्तित्व टिकवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. लहानशा प्रयत्नांमधून आपण मोठा बदल घडवू शकतो. जर प्रत्येकाने आपल्या घराजवळ चिमण्यांसाठी थोडीशी जागा आणि अन्न-पाणी उपलब्ध करून दिले, तर या सुंदर पक्ष्याचे अस्तित्व नक्कीच टिकून राहील. जागतिक चिमणी दिन हा केवळ एक दिनविशेष नसून तो पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा दिवस आहे. चिमण्यांचे अस्तित्व वाचवणे म्हणजे निसर्गाचा समतोल राखणे होय.


चला, या निमित्ताने आपण सर्वजण एक छोटासा संकल्प करूया... चिमण्यांचे संरक्षण करूया... आणि निसर्गाशी आपले नाते अधिक घट्ट बनवूया.

# बाप-लेकाच्या जोडीची कमाल!

## रस्त्याच्या कडेला सुरू केला भन्नाट व्यवसाय, आता दिवसाला २७ लाखांची कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रचंड इच्छाशक्ती आणि प्रमाणिकपणे काम करण्याची तयारी असेल तर कुठलीही गोष्ट अशक्य नसते. यश नक्की मिळत असते. आज आपण अशीच एक यशोगाथा जाणून घेणार आहोत. वडील आणि मुलाने मिळून आपल्या व्यवसायात मोठं नाव कमवलं आहे. आणि संपूर्ण देशभरात त्यांची चर्चा आहे.




### एक ढाबा बनला १०० कोटींचा साम्राज्य

हरियाणाच्या सोनीपत जिल्ह्यातील मुरथल हे एक सुप्रसिद्ध ठिकाण आहे. या परिसराची ओळख निर्माण करण्यात अमरिक सुखदेव ढाब्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोणत्याही जाहिरातीशिवाय हा ढाबा १०० कोटी रुपयांचे साम्राज्य बनला आहे. याचे मालक अमरिक सिंग आणि सुखदेव सिंग आहेत. याची स्थापना १९५६ मध्ये अमरिक आणि सुखदेव यांचे वडील, सरदार प्रकाश सिंग यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका छोट्या तंबूत केली होती. १९९० च्या दशकात त्यांचे पुत्र, अमरिक आणि सुखदेव यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर, या ढाब्याला प्रचंड लोकप्रियता मिळाली. 'मुरथलचे पराठे' हे अमरिक सुखदेव यांचे नाव बनले. दिल्ली-एनसीआरसह दूरदूरवरून लोक येथे जेवायला येतात. आणि यांची एक दिवसाची कमाई २७ लाख रुपये आहे.

### ढाब्याची सुरूवात १९५६ मध्ये झाली

सरदार प्रकाश सिंग यांनी १९५६ मध्ये हा ढाबा सुरू केला आणि आपले मुलगे अमरिक व सुखदेव यांची नावे ठेवली. सुरुवातीला, येथे प्रामुख्याने ट्रक ड्रायव्हर्सना सेवा दिली जात असे. तथापि, हळूहळू येथील स्वादिष्ट तंदुरी पराठ्यांमुळे, विशेषत: पांढऱ्या लोण्यासोबत मिळणाऱ्या पराठ्यांमुळे, याला लोकप्रियता मिळाली. हा इतका लोकप्रिय झाला की दिल्ली-चंडीगड मार्गावरून प्रवास करणाऱ्या कुटुंबांमध्ये आणि पर्यटकांमध्ये तो एक आवडता ढाबा बनला.

### मुलांनी केला कायापालट

१९९० च्या दशकात, सरदार प्रकाश सिंग यांचे मूलं अमरिक आणि सुखदेव यांनी हा ढाबा ताब्यात घेतला. त्यानंतर याला प्रचंड लोकप्रियता मिळाली. त्यांनी या साध्या जागेचे एका आधुनिक रेस्टॉरंटमध्ये रूपांतर केले. एकेकाळी ट्रक ड्रायव्हर्ससाठी असलेला हा रस्त्याच्या कडेचा ढाबा आता 'अमरिक सुखदेव रेस्टॉरंट' बनला आहे.

### महिन्याला ८ कोटींची कमाई

एका अहवालानुसार तुम्ही या ढाब्याला कधीही भेट दिल्यास १५० हून अधिक टेबलांवर किमान ६०० लोक जेवत असतात. प्रत्येक टेबलसाठी अंदाजे ४५ मिनिटांचा वेळ लागतो आणि दिवसातून १५ वेळा टेबल रिकामे होऊन पुन्हा भरले जातात असे गृहीत धरल्यास हे रेस्टॉरंट दररोज अंदाजे ९,००० लोकांना सेवा देते. प्रत्येक ग्राहक सरासरी ३०० रुपयांपेक्षा जास्त खर्च करतो. याचा अर्थ असा, की हे रेस्टॉरंट कोणत्याही दिवशी २७ लाख रुपये कमावते. यावरून मासिक उत्पन्न अंदाजे ८ कोटी रुपये होतो आणि वार्षिक उत्पन्न १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असतो.

### बस आणि कॅब चालकांना मोफत जेवण

अमरिक आणि सुखदेव यांनी ट्रक, बस आणि कॅब चालकांना सवलतीत आणि मोफत जेवण देण्याची प्रथा सुरू केली. यामुळे ते त्यांच्या रेस्टॉरंटमध्ये थांबण्यास प्रोत्साहित झाले. त्यांनी जेवणाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता त्यांच्यामध्ये आपली प्रतिष्ठाही जपली. यामुळे केवळ नवीन ग्राहकच आकर्षित झाले नाहीत, तर पहिल्यांदा येणारे ग्राहकही नियमित ग्राहक बनले. तसेच जेवणाचा दर्जा केवळ उत्कृष्टच नव्हे, तर त्याची चवही कायम चांगली राहील याची ते पूर्ण काळजी घेतात.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# साधनेत अफाट शक्ती!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अयोध्येतील गोष्ट. एक संत अयोध्येत श्रीरामायण कथा करीत होते. दररोज एक तास असे त्यांचे प्रवचन होत असे. यासाठी मोठी गर्दी जमत असे. लोक अगदी आनंदाने तल्लीन होत ही रामकथा ऐकत असत. या संत महोदयांचा एक नियम होता. दररोज कथा सुरू करण्याआधी ते 'या हनुमंतजी स्थानापन्न व्हा' असे म्हणून हनुमानजींचे आवाहन करीत आणि मग एक तास प्रवचन करीत असत.

ही प्रभू श्रीरामचंद्रांची कथा ऐकण्यासाठी दररोज एक वकील यायचा. हे प्रवचन ऐकताना त्याच्याही मनातील भक्तिभाव उचंबळून येत असे. एकदा या भक्तिभावावर तर्कसंगती शिरजोर झाली. त्याला वाटले, की हे महाराज रोज 'या हनुमानजी स्थानापन्न व्हा' असे म्हणतात खरे; पण काय खरोखर हनुमानजी येत असतील. हा असा विचार करता-करता या वकिलाने त्या संत महोदयांना शेवटी विचारलेच, की 'महाराज, तुम्ही रामायण खूप सुंदर सांगता. तुमच्या प्रवचनामुळे मनाला खूप आनंद मिळतो. पण तुम्ही दररोज एक आसन हनुमानजींसाठी ठेवता आणि त्यावर त्यांना बसायला सांगता. मला एक सांगा, त्यावर खरोखर हनुमानजी येऊन बसतात का?' त्यावर ते साधू महाराज म्हणाले, की अर्थातच. मला पूर्ण खात्री आहे, की रामकथा सुरू आहे म्हणजे हनुमानजी येथे नक्कीच येत असणार. यावर तो वकील म्हणाला, की महाराज, हे असे नुसतेच म्हणून चालणार नाही. हनुमानजी येथे येतात, याचे कुठले तरी प्रमाण द्या. तुम्ही लोकांना प्रवचन सांगत आहात, चांगली गोष्ट आहे. पण तुम्ही तुमच्यासमोर स्वतः हनुमानजी उपस्थित आहेत हे सांगून लोकांना चुकीच्या पद्धतीने प्रभावित करीत आहात. तुम्हाला हे सिद्ध करावेच लागेल, की हनुमानजी तुमची कथा ऐकायला येतात.

वकिलाला या महाराजांनी खूप समजावले. आस्था हा वैयक्तिक श्रद्धेचा विषय आहे. हा भक्त आणि भगवान यातील प्रेमरस आहे. यात साक्ष, प्रमाण देणे या गोष्टी आणणे चुकीचे आहे. यावर ते महाराज हेही म्हणाले, की जर तुम्ही म्हणत असाल तर मी प्रवचन बंद करतो किंवा तुम्ही कथेसाठी येणे बंद करा. महाराज समजावत राहिले. मात्र वकिलाने त्यांचे काहीही ऐकून घेतले नाही. तो म्हणाला, की बरेच दिवस झाले तुम्ही हनुमानजी येत असल्याचा दावा करीत आहात. तुम्ही हीच गोष्ट बाकी ठिकाणीही करीत असणार. त्यामुळे हनुमानजी कथा ऐकायला येतात, हे तुम्हाला सिद्ध करून दाखवावेच लागेल.

दोघांमधला हा वाद खूप वाढला, अगदी विकोपाला गेला. शेवटी त्या साधू महाराजांनी माघार घेतली आणि म्हणाले, की हनुमानजी येथे येतात की नाही, हे उद्या मी सिद्ध करून दाखवीन. उद्या जेव्हा कथा सुरू होईल तेव्हा एक प्रयोग करीन. ज्या आसनावर मी हनुमानजींना बसण्यास सांगतो ती गादी तुम्ही आज तुमच्या घरी घेऊन जा. उद्या येताना गादी बरोबर घेऊन या. मग मी तुमच्यासमोरच गादी आसनावर ठेवीन आणि कथा सुरू करण्यापूर्वी हनुमानजींना बोलावीन. मग तुम्ही ही गादी उचलून वर धरा. जर ही गादी तुम्हाला उचलून वर धरता आली, तर समजा की हनुमानजी येथे नाही येत. यासाठी वकील तयार झाला. महाराज पुढे म्हणाले, की दोघांपैकी जो पराजित होईल तो काय करणार? हेही ठरवा. कारण ही शेवटी सत्याची परीक्षा आहे. यावर वकील म्हणाला, की मी जर गादी उंचावू शकलो नाही तर मी माझी वकिली सोडून देईन आणि तुमच्याकडून दीक्षा घेईन. पण जर तुम्ही पराजित झालात तर तुम्ही काय कराल? यावर ते महाराज म्हणाले, की मी कथावाचन सोडून तुझ्या कार्यालयाचा शिपाई होईन.

दुसऱ्या दिवशी कथेसाठी खूप मोठी गर्दी जमली. जे लोक दररोज कथा ऐकायला अजिबात येत नव्हते तेही भगवंताची भक्ती, विश्वास, प्रेम याची परीक्षा बघायला तेथे आले. प्रवचनाची जागा तुडुंब भरली. साधू महाराज आणि वकील दोघेही प्रभू श्रीरामचंद्र यांच्या कथेच्या ठिकाणी आले. वकिलाने आपल्याबरोबर गादी आणली होती. ती आसनावर ठेवली गेली. त्या महात्म्याने भरल्या डोळ्यांनी मंगलाचरण म्हटले आणि मग म्हणाले, की 'या हनुमंतजी स्थानापन्न व्हा.' हे असे म्हणताच साधू महाराजांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. ते मनातल्या मनात म्हणाले, की प्रभू, हा माझा नाही तर रघुकुलाच्या रीतीचा, परंपरेचा प्रश्न आहे. मी एक अतिशय साधारण व्यक्ती आहे, माझ्या भक्तीची, आस्थेची लाज राखा. मग त्यांनी वकिलाला बोलावले आणि म्हणाले, की तुम्ही पुढे या आणि गादी उचलून वर धरा. तेथे जमलेले सगळे लोक श्वास रोखून आता पुढे काय घडणार, याकडे बघू लागले. वकील महोदय उभे राहिले आणि पुढे येत त्यांनी गादी उचलण्यासाठी म्हणून हात पुढे केला. पण वकिलाला गादीला हातही लावता आला नाही. त्याने तीन वेळा प्रयत्नपूर्वक हात पुढे केला पण तिन्ही वेळा त्याला अपयश आले. हे दृश्य ते महात्मा बघत होते. वकिलाला गादी उचलून धरणे तर दूरची गोष्ट; पण ते गादीला साधा स्पर्शही करू शकत नाहीत. वकिलाने तीन वेळा प्रयत्न केला आणि तिन्ही वेळा त्याला भयंकर थकवा आला. तो घामाने भिजला आणि शेवटी त्या वकिलाने साधू महाराजांच्या चरणांवर लोटांगण घातले. वकील म्हणाला, की महाराज, गादी उचलणे तर दूरची गोष्ट, कसे काय ते माहीत नाही. पण प्रयत्न करूनही माझा साधा हातही गादीपर्यंत पोहोचू शकत नाही. तेव्हा मी माझा पराभव मान्य करीत आहे. त्या दिवशी तेथे श्रद्धा आणि भक्ती, आणि एका साधकाच्या साधनेत किती शक्ती असते हे सिद्ध झाले. देवाची मूर्ती ही पाषाणाचीच असते. पण भक्ताचे भाव त्या मूर्तीत प्राणप्रतिष्ठा करतात आणि प्रत्यक्ष देव त्या मूर्तीत वास करायला येतात. भक्तीची ही शक्ती आहे आणि ही सामान्य बुद्धीच्या पलीकडची गोष्ट आहे.

**। जय श्रीराम, जय हनुमान।**

# श्री मंगळग्रह मंदिरात झाले ५१ फुटी महामंगल गुढीपूजन

## अक्षय कृषी परिवाराचे डॉ. गजानन डांगे यांच्यासह विविध मान्यवरांनी केली विधिवत पूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ख्यातनाम श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही गुरुवार, दि. १९ मार्च रोजी चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यानिमित्त सकाळी साडेसातच्या सुमारास ५१ फूट उंचीची महामंगल गुढी उभारण्यात आली. अक्षय कृषी परिवाराचे उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे यांच्या शुभ हस्ते विधिवत गुढीचे पूजन झाले.

याप्रसंगी शंखनाद व प्रभू श्रीरामचंद्रांच्या नामाचा जयघोष करण्यात आला.

सुरूवातीला आराध्य दैवत श्री गणपती बाप्पांना आवाहन करून मूर्तीवर मंत्रोपचाराच्या माध्यमातून विधिवत अभिषेक पूजा करण्यात आली. त्यानंतर ५१ फुटी गुढीची विधिवत पूजा-अर्चा करून आकर्षक पद्धतीने ती सजविण्यात येऊन नैवेद्य दाखविण्यात आला. याप्रसंगी उपस्थित भाविकांनी प्रभू श्रीरामचंद्र तसेच श्री मंगळग्रह भगवंतांचा जयघोष केला. त्यानंतर गुढी उभारण्यात आली. मंदिराचे पुरोहित जयेंद्र वैद्य यांनी मुख्य पौरोहित्य केले. त्यांना गणेश जोशी, अतुल दीक्षित, हेमंत गोसावी व उमेश पाठक यांनी सहकार्य केले.

यावेळी अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोजभाई सोलंकी, कृषक पर्यावरणतज्ज्ञ पद्मश्री सुभाष शर्मा, सचिव डॉ. बेरीदम गुणाकर, भूमी सुपोषण अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक नवल रघुवंशी आदींसह मंगळग्रह सेवा संस्थेचे सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार अनिलदादा पाटील यांनीही विधिवत पूजन केले.



*अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात गुरुवारी सकाळी गुढी उभारण्यापूर्वी आराध्य दैवत श्री गणपती बाप्पांना आवाहन करून मूर्तीवर मंत्रोपचाराच्या माध्यमातून विधिवत अभिषेक पूजा करताना अक्षय कृषी परिवाराचे उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे. शेजारी अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोजभाई सोलंकी, कृषक पर्यावरणतज्ज्ञ पद्मश्री सुभाष शर्मा, सचिव डॉ. बेरीदम गुणाकर, भूमी सुपोषण अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक नवल रघुवंशी, किशन शर्मा आदी.*



गुढीची मंत्रोपचाराच्या माध्यमातून विधिवत पूजा-अर्चा करताना आमदार अनिलदादा पाटील.



गुढी उभारल्यानंतर प्रभू श्रीरामचंद्र व मंगल भगवंतांचा जयघोषप्रसंगी डॉ. डांगे यांच्यासह अक्षय कृषी परिवाराचे पदाधिकारी व मंदिराचे सेवेकरी व भाविक.

# अमळनेरात हिंदू नववर्षानिमित्त भव्य शोभायात्रा

## हिंदू नववर्ष स्वागत समितीचा उपक्रम; विविध हिंदुत्ववादी संघटना व कार्यकर्त्यांचा सहभाग



*अमळनेर : हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे गुरुवारी शहरातून काढण्यात आलेली शोभायात्रा.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे दरवर्षीप्रमाणे हिंदू नववर्ष प्रारंभ अर्थात गुढीपाडव्यानिमित्त गुरुवार, दि. १९ मार्च रोजी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या समितीचे यंदाचे २२ वे वर्ष होते.

सुरूवातीला गुढी उभारून तसेच श्रीमंत प्रतापशेठजी यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर प्रताप मिल परिसरातील बन्सीलाल पॅलेसमधून शोभायात्रेचा प्रारंभ झाला. शोभायात्रेत गायत्री परिवार, प्रजापती ब्रह्माकुमारी, आर्मी स्कूल, स्वामीनारायण मंदिर, विश्व हिंदू परिषद, भगवान महावीर, अग्रेसन महाराज, प्रताप महाविद्यालय, स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल, औषधनिर्माण महाविद्यालय, क्षेत्रीय माळी समाज, संत गाडगेबाबा तसेच श्री गजानन महाराज मंदिर आदी विविध संस्था व मंडळांच्या आकर्षक रथांनी सहभाग नोंदविला. ढोल-ताशांच्या गजरात, घोषणाबाजी आणि पारंपरिक धार्मिक वातावरणात निघालेली शोभायात्रा रंगतदार ठरली. शहरातील तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग हे यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. विविध सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील देखाव्यांनी नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी 'जय श्रीराम' व 'भारत माता की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शोभायात्रेप्रसंगी मार्गावर नागरिकांनी ठिकठिकाणी पाणी, शरबत व नाश्ताची व्यवस्था केली. तसेच घरांसमोर आकर्षक रांगोळ्या काढून व गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले.

शोभायात्रा प्रताप मिल, स्टेशन रोड, स्वामीनारायण मंदिर, सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, दगडी दरवाजा, सराफ बाजार, वाडी चौक, माळी वाडा, झामी चौक पोलीस चौकी, राजहंस चौक, पवन चौक, तिरंगा चौक, पाचपावली देवी मंदिर, कोंबडी बाजार, विजय शॉपी, पोस्ट ऑफिस, बजरंग सुपर मार्केट मार्गे श्री संकटमोचक हनुमान मंदिरात सांगता झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. हिंदू नववर्ष स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. बजरंगशेठ अग्रवाल, डी. डी. पाटील व नीरज अग्रवाल यांनी सहभागी नागरिकांचे आभार मानले.

# सकारात्मक ऊर्जेचा संचार 'शंख'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील विविध आध्यात्मिक विधी आणि पूजेमध्ये शंखाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शंख हा केवळ पूजेचा एक भाग नसून तो घरामध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार करणारा एक प्रभावशाली स्रोत मानला जातो. धार्मिक मान्यतेनुसार, जर आपण आपल्या घरात शास्त्रोक्त पद्धतीने आणि योग्य दिशेला शंखाची स्थापना केली, तर भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची सदैव विशेष कृपा घरातील सदस्यांवर राहते. मात्र, वास्तुशास्त्राचे नियम न पाळल्यास त्याचे विपरीत परिणामही होऊ शकतात. त्यामुळे शंख ठेवताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

### शंख ठेवण्यासाठी सर्वोत्तम दिशा

वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार घराच्या देव्हाऱ्यात किंवा मंदिरात शंख ठेवताना दिशा निवडणे अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी 'ईशान्य' दिशा ही सर्वात उत्तम आणि फलदायी मानली गेली आहे. ज्योतिषशास्त्र आणि वास्तु तत्त्वांनुसार, ईशान्य कोपरा हा देवतांचा वास असणारा अत्यंत पवित्र कोपरा समजला जातो. या ठिकाणी भगवान विष्णूंचे स्थान असल्याचे सांगितले जाते, त्यामुळे या दिशेला शंख ठेवल्याने संपूर्ण घरात शांती लाभते आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते.

### चुकीच्या दिशेमुळे होऊ शकते नुकसान

ज्याप्रमाणे योग्य दिशा लाभदायी ठरते, त्याचप्रमाणे चुकीच्या दिशेला शंखाचे तोंड करून ठेवल्याने घराचे वातावरण बिघडू शकते.



वास्तुशास्त्रानुसार, शंख कधीही घराच्या किंवा देव्हाऱ्याच्या दक्षिण दिशेला ठेवू नये. असे मानले जाते की, दक्षिण दिशेला शंख ठेवल्यास घरात नकारात्मक उर्जेचा प्रभाव वाढतो. यामुळे केवळ मनःशांतीच भंग पावत नाही, तर आर्थिक नुकसान सोसावे लागण्याची शक्यता असते आणि कुटुंबाच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

### स्वच्छतेचे पालन करणे आवश्यक

अनेक घरांमध्ये शंख योग्य दिशेला तर ठेवला जातो, परंतु त्याच्या स्वच्छतेकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. वास्तूच्या नियमांनुसार शंखाचे पावित्र्य टिकवून ठेवण्यासाठी तो वेळोवेळी स्वच्छ करणे अनिवार्य आहे. शंखाची शुद्धता राखण्यासाठी आठवड्यातून किमान एकदा तरी तो गंगाजलाने स्वच्छ करावा. जर आपल्याकडे गंगाजल उपलब्ध नसेल, तर स्वच्छ गोड्या पाण्याचा वापर करूनही शंख धुता येतो, जेणेकरून त्यातील सात्विकता कायम राहील.

### शंख ठेवण्याचे आणि वाजवण्याचे लाभ

घरातील देव्हाऱ्यात नियमानुसार शंख ठेवल्यास अनेक वास्तुदोष आपोआप दूर होण्यास मदत होते. जेव्हा कधी घरात शंख वाजवला जातो, तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या ध्वनीलहरी वातावरणातील नकारात्मकता नष्ट करतात आणि मनाला कमालीची शांती देतात. नियमितपणे शंख पूजन आणि शंखनाद केल्याने घरात लक्ष्मी मातेचा कायमस्वरूपी निवास होतो, ज्यामुळे कुटुंबात सुख, समृद्धी आणि एकूणच कल्याणकारी वातावरण निर्माण होते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**